# आगी : ग्रीसमधील आणि अमेरिकेतील

चन्द्रशेखर पुरन्दरे

ग्रीसमध्ये निर्वासितांच्या छावणीला आग लागली व सुमारे तेरा हजार लोक उघड्यावर आले. अमेरिकेत वणवे पेटले आहेत आणि ते प्रचंड भूभागावर पसरत आहेत. ग्रीसमध्ये देवो दुर्बलघातक: या वचनाची आठवण व्हावी तर अमेरिकेत पर्यावरणाची हानी काय विनाश करू शकते ते दिसत आहे.

**ग्रीस**

सीरिया, लिबिया, अफगाणिस्तान, पाकिस्तान, येमेन अशा अनेक देशातून लोक सुरक्षित बऱ्या जीवनासाठी युरोपला विशेषत: २०१५पासून स्थलांतरित होत आहेत. त्यांच्या मायदेशातील युद्धे, जिवंत राहिले तरी सामाजिक असुक्षितता, गरीबी, उपासमार, धार्मिक छळ अशी अनेक कारणे लोकांना स्थलांतर करायला भाग पडतात. लाखाने लोक युरोपच्या किनाऱ्यावर तराफ्यांनी, जीव धोक्यात घालून हा प्रवास करत होते. त्यानंतर हा खडतर जीवघेणा प्रवास थांबला नाही पण ओघ बराच कमी झाला. जे आले ते बहुधा इटली, ग्रीस, तुर्कस्तान या भूमध्य समुद्रावरील देशांत आले, त्यांचे उद्दिष्ट पश्चिम युरोप मुख्यत: जर्मनी होते. मानवी हक्कांबद्दल युरोपचा कायम गजर असतो तो इतर देशांवर टीका करण्यासाठी. हे लोक आपल्या देशात कायमचे रहाणे त्यांना नको असते. या द्विधा मनस्थितीमुळे युरोपने निश्चित अशी भूमिका घेतली नाही किंवा धोरणही आखले नाही. परिणामत: निर्वासित ज्या देशात गेले त्या देशाला त्यांची नाईलाजाने कशीबशी व्यवस्था लावायला लागली उदा. ग्रीस.

बरेच निर्वासित ग्रीसने त्या देशाच्या मोरिया नावाच्या एका बेटावर ठेवले. तेथे त्यांच्यासाठी तात्पुरती छावणी उभारण्यात आली. त्या छावणीची क्षमता तीन हजार लोक सामावून घेण्याची होती. पण अल्पावधीतच नव्याने येणारे निर्वासित ठेवायचे कोठे म्हणून या बेटावर त्यांना पाठवण्यात आले. काही महिन्यांपूर्वी तर तेथे २० हजाराहून अधिक लोक होते. म्हणजे क्षमतेच्या सातपट. तेथे आधीच राहण्याची परिस्थिती हलाखीची. तंबू, जहाजाने मालवाहतूक ज्यातून होते ते कंटेनर्स. नळाचे पाणी नाही, शौचालये, गटारे नाहीत, आरोग्यसेवा नाही, एकूण अस्वच्छता. कमी जागेत स्त्रिया, मुले व प्रौढ पुरुष दाटीवाटीने कोंबलेले. या असहायतेतून आलेला असंतोष खदखदत होता. राहणाऱ्यांच्यात तीन चतुर्थांश अफगाण. निर्वसितांसाठी हा युरोपमधला सर्वात मोठा कॅम्प.

त्यात कोरोनाचा उद्‌भव झाला. आधी बकाल राहणीमान, त्यात सरकारने या वसतीवर लॉकडाऊन लावला आणि कोरोनाच्या चाचण्या सुरू केल्या. सगळ्या लोकांच्या चाचण्या करण्याचा सरकारी इरादा होता. पण ३५ लोक बाधित आढळल्यावर चाचण्या पूर्ण होण्याआधीच साचलेला आणि लॉकडाऊनविरुद्धचा नैमित्तिक असंतोष अक्षरश: भडकला. कॅम्पमध्ये लोकांची अस्वस्थता व निषेध वाढत आहेत असे लक्षात आल्यावर पोलीसांनी अश्रूधूर सोडला, काही अफगाण निर्वासितांनी ८ सप्टेंबरच्या रात्री आग लावली. अशी एक वार्ता. अश्रुधूराच्या गडबडीत लहान मुलांनी जागोजागी छोट्या आगी लावल्या ही दुसरी वार्ता. वारा, फुटणारे गॅस सिलिंडर्स यामुळे आग पसरली आणि अख्खी छावणी बेचिराख झाली. या रहिवाश्यांच्यात सुमारे चार हजार मुले. त्यातील सुमारे चारशे पोरकी मुले या छावणीतील एका अलग भागात ठेवण्यात आली होती. तो भागही जळाला. प्राणहानी बहुधा झाली नसावी. काही लोक छावणी सोडून शेजारच्या ऑलिव्हच्या वनराईत पळाले. अंगावरच्या कपड्यांनिशी रस्त्यावर रात्र काढण्याची वेळ बहुतेकांवर आली. ९ सप्टेंबरला परत दुसरी आग लागली [ही तिसरी वार्ता] आणि छावणीचा उरलेला भागही जळाला. आगीमागे

असंतोष हे एक कारण होतेच पण ही छावणी जाळली तर सरकार बेटावरून आपल्याला दुसरीकडे हलवेल अशी आशाही होती.

तसे घडले नाही. एकतर ग्रीसमधील इतर कोणत्याच शहराला किंवा प्रांताला निर्वासित नकोत. सामाजिक सुरक्षा हे या नकारामागचे एक कारण, तर कोरोनाची भीती हे दुसरे. तातडीने दुसरी छावणी त्या बेटावरच उभारणे सुरू झाले. हे नवीन तंबू असतील. रस्त्यावर आलेल्या निर्वासितांना तेथे जायचे नाही. 'रस्त्यावर रहाणे वाईटच पण छावणी त्याहून वाईट'. एका दिवसातच तेथेही पाणी नाही, अपुरे अन्न, शौचालये नाहीत त्यामुळे लोक मलमूत्रविसर्जन समुद्रात किंवा तंबूबाहेर करतात या गोष्टी दिसत आहेत. त्यावर कधी काय सुधारणा होणार कोणास ठाऊक. त्यात कोरोना बाधितांपैकी काही गायब झाले असावेत.

युरोपिअन युनिअनही जरा हलली. ग्रीस त्याचा सदस्य आहे. आमच्यावर हा बोजा पडत आहे , मदत द्या, काही निर्वासित तरी घ्या अशी मागणी इतकी वर्षे ग्रीस करत होता. तिकडे आजवर दुर्लक्ष झाले. आता पोरक्या मुलांना आणि सुमारे एक हजार निर्वासितांना आश्रय देऊ असे फ्रांस व जर्मनीने म्हटले आहे. विशेष म्हणजे अशा घटनांनंतर मदतीचा ओघ लगेच सुरू होतो. तो झाल्याचे दिसत नाही.

या दुर्घटनेमागचे प्रवाह दीर्घकालीन आहेत. ही वेळ या लोकांवर येणे हे वरवर पहाता त्यांच्या स्थानिक सभोवतालचा परिणाम, त्यांच्या देशांचे अपयश आहे. पण ते अपयश काही रातोरात आले नाही. अफगाणिस्तानातील हिंसक अराजक गेली चाळीस वर्षे तरी सुरू आहे. दोन पिढ्या त्यात बरबाद झाल्या आहेत. सीरियातील यादवी गेली नऊ वर्षे चालू आहे. येमेनमधील हिंसाचार गेली सहा-सात वर्षे. व्यापारी हितसंबंधासाठी देशाच्या सीमा न मानणारे उर्वरित जग अशा 'अंतर्गत' संघर्षांकडे, हुकूमशाहींकडे दुर्लक्ष करते. या दुर्लक्षाला उर्वरित जगातील जनतेची मूक संमती असते. पश्चिम युरोप, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान वगैरे श्रीमंत विकसित देशांच्या लोकशाही व्यवस्थेचे औदासिन्य हे अशा प्रसंगांना अप्रत्यक्षरीत्या जबाबदार आहे. निर्वासित हे लक्षण आहे, विकार नाही. इलाज विकारावर करायला हवा. तो होत नाही.

**अमेरिका**

अमेरिका देशाच्या पश्चिम किनाऱ्यावरील वॉशिंग्टन, ओरेगॉन आणि कॅलिफोर्निया राज्यांमध्ये शंभरहून अधिक वणवे पेटले आहेत. एप्रिलला तुरळक सुरुवात झाली, जुलैपासून ते वाढू लागले आणि ऑगस्टपासून रुद्र झाले आहेत. आजवर या वणव्यांनी ६७ लाख एकर जमीन जळून गेली आहे. अनेक गावे बेचिराख झाली आहेत, लाखात लोक विस्थापित झाले आहेत व होत आहेत. तीसच्या आसपास लोक मृत्यूही पावले आहेत, अनेक जिवंत का मृत हे माहित नाही. या राज्यांमध्ये धूर, घातक रसायनांचे हवेतील प्रमाण अतोनात वाढले आहे. पर्यावरणाचे वाढते तपमान, कोरडी हवा, कार्बनचे हवेतील वाढते प्रमाण, जंगलतोड, इत्यादी सर्वविदित करणे यामागे आहेत. आजवर पर्यावरणाचे अभ्यासक ज्या प्रकोपाची भीती व्यक्त करत होते, तो प्रकोप प्रत्यक्षात आला आहे.

दुर्दैवाने हा जीवन-मरणाचा प्रश्न राजकारणाशी निगडित झाला आहे. अशा वेळी आवश्यक असणारे दूरदर्शी राजकीय नेतृत्व अमेरिकेत नाही. ट्रम्प महाशय अजून झाडीवर देखरेख पुरेशी नाही म्हणून आगी लागल्या आणि वाढल्या असे म्हणत आहेत. पृथ्वीच्या वाढत्या तपमानामागे मानवनिर्मित कारणे आहेत हे अमान्य करत आहेत. त्यामुळे उदा. हवेत कार्बन सोडणाऱ्या गाड्या, उद्योग यावर नियंत्रणाचे धोरण नाही. यथा राजा तथा प्रजा या न्यायाने पर्यावरणातील अनिष्ट बदल आणि वणवे यांचा कार्यकारणभाव नाही असे मानणारे अमेरिकन्स ट्रम्पच्या बाजूने आहेत. येत्या अध्यक्षीय निवडणुकीत विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाने पर्यावरण हा मुद्दा प्राधान्यावर घेतला आहे. जर तो पक्ष जिंकलाच तर कालांतराने तरी काही सुधारणा होईल अशी आशा मात्र आज करता यावी. तेव्हाही अदूरदृष्टी असणारे हितसंबंध तशा धोरणाची अंमलबजावणी हव्या त्या प्रमाणात करू देणार नाहीत, ही शक्यता आहेच.

दक्षिण अमेरिका खंडातील ब्राझील देशात हीच आणीबाणीची परिस्थिती आली आहे. त्यात दृश्य मानवी हानी अजून मोठ्या प्रमाणावर नसल्याने सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. ब्राझीलमधील दोन प्रचंड [खंडप्राय] भूभागात आगी लागल्या

आहेत आणि त्या आटोक्यात येत नाहीत कारण तसा नेटाने प्रयत्नच नाही. पंतानाल नावाचा पश्चिम ब्राझीलमधील दलदलीचा भूभाग आणि जवळजवळ सगळाच ब्राझील व्यापणारे अमेझॉनचे जंगल हे ते दोन भूभाग. अमेझॉनच्या जंगलाच्या श्वसनातील ग्रहण होणारा कार्बन आणि बाहेर येणारा प्राणवायू यामुळे ते जंगल ही पृथ्वीची फुफ्फुसे म्हटली जातात.

या दोन्ही प्रदेशात अधिकाधिक वन्य जमीन शेतीखाली आणण्याच्या शेतकऱ्यांच्या प्रयत्नाने आगी लावण्यात आल्या आहेत. पंतानालमध्ये जानेवारीपासून १५,००० आगी लागल्या. मागच्या वर्षी या कालावधीत त्या ५००० होत्या. तर २०१८ साली १-१,५००. यावरून वाढत्या हानीची कल्पना येते. सप्टेंबरपर्यंत या भूभागातील १७ टक्के जमीन म्हणजे सुमारे २४,००० चौरस किलोमीटर्स आगीखाली गेले. या प्रदेशात एक हजाराहून जास्त पक्षी, प्राण्यांच्या जाती आहेत, साडेतीन हजाराहून अधिक प्रकारच्या वनस्पती आणि नऊ हजाराहून अधिक कृमींच्या जाती आहेत. यांच्यातील जिवंत राहिलेल्यांवर आगीचा अनिष्ट परिणाम होणार. उदा. जळालेली झाडे फळे देणार नाहीत, त्यावर अवलंबून असणाऱ्या प्राण्यांना अन्न मिळणार नाही, वगैरे. अमेझॉनच्या जंगलात या सप्टेंबरमध्ये, एका महिन्यातच २०,००० हून अधिक आगी आढळल्या. त्यांचा दुष्परिणाम असाच, आणखी मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वैविध्यावर होत आहे.

खाणी, नवीन मानवी वस्ती आणि पसरती शेती याने वृक्षतोड होते. एका अभ्यासानुसार १९७० पासून २०१६ पर्यंत जगातील प्राण्यांची संख्या दोन-तृतीयांशाने कमी झाली. त्यातील ९४ टक्के घट द. अमेरिका खंडात झाली आहे. त्यात या वर्षीची ही भर.

www.purandarearts.com
www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk